नि.फौ.ख.क्रं. २४५/२०२४
शासन वि. बाळासाहेब
नि.क्र. ५५/क

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं. ७ यांची शपथेवर जबानी**

नाव : विकास मधुकरराव जाधव

वय : ३९ वर्षे

व्यवसाय : पो. ह. ब.नं. २४

राहणार : पोलीस स्टेशन आष्टी.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. व्ही.एम. दारुणकर यांचेमार्फत**

१. मी २०२३ साली पोलीस नाईक म्हणून आष्टी पोलिस स्टेशन ला नेमणूकीस होतो. दि. ०३/१२/२०२३ रोजी कडा पोलीस चौकीचे प्रभारी चाटे यांच्याकडुन शिराळ येथे दोन गटात मारहाण झाल्याचे त्यातील एक गट सरकारी दवाखाना आष्टी येथे गेल्याचे सांगितले. सदर गुन्ह्याबाबत पोलीस स्टेशनला आष्टी दवाखान्यातुन पत्राद्वारे माहिती मिळाली. सदर पत्र दाखवण्यात आले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. पत्रास **नि. पि. ५६/पी.डब्ल्यु. ७** देण्यात येते. त्या पत्रानुसार मी सरकारी दवाखाना आष्टी येथे गेलो. तेथे फिर्यादी वंदना यांना डोक्याला पट्टी केल्याचे व सलाइन लावल्याचे दिसुन आले. तसेच फिर्यादीचे पती सा.क्र. २ राजेंद्र यांना डोक्याला दुखापत झाल्याचे दिसले. उपचार केल्यानंतर फिर्यादीने कडा पोलीस चौकी येथे गुन्ह्याबाबत दि. ०५/१२/२०२३ रोजी फिर्यादी दिली. वरिष्ठांच्या आदेशान्वये गु.र.नं. ५२७/२०२३ चा तपास माझ्याकडे आला.

२. मला तपासाकामी प्रथम खबरी अहवाल, फिर्याद, व इतर कागदपत्रे मिळाली. मी २ पंचाना घेवुन यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. आता साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर दोन पंचाची व माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **नि.पी.५७/पी.डब्ल्यु ७** देण्यात येते. सदर पंचनाम्याद्वारे घटनास्थळावरुन लोखंडी फावडे व दगड **एम.ओ. १ व २** जप्त केले. सदर मुद्देमाल तोच आहे. मुद्देमालाच्या लेबलवर माझी व पंचाची सही आहे. त्याची नि. २ प्रमाणे मुद्देमाल पावती दोषारोपपत्रासह दाखल केली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

३. त्यानंतर साक्षीदाराचे तपास टिपण त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले व त्यावर माझी सही आहे. आरोपीस फौ.प्र.सं. ४१–अ प्रमाणे नोटीस दिली व त्यांचे चेहरेपट्टी फॉर्म भरुन घेतले. सरकारी दवाखाना आष्टी येथे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी पत्र दिले. साक्षीदारास **नि.पी.५८/पी.डब्ल्यु ७** वरील पत्र दाखवण्यात आले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यानुसार वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाले. आरोपींना कलम १७० प्रमाणे नोटीस दिली. आरोपी विरुध्द तपासाअंती गुन्हा

केल्याचे व दोन्ही पक्षात वाद झाल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे विरुध्द सबळ पुरावे मिळून आलेने त्यांचे विरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीस पाहिलेस ओळखू शकतो. आरोपी क्र. १ व २ न्यायालयात हजर आहे. **नि. ५४** नुसार आरोपी क्र. ३ ते ६ यांची हजेरीमाफी ओळख न नाकारण्याच्या अटीसह मंजुर.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. ए.एस. निंबाळकर यांचे मार्फेत उलटतपास**

४. सन–२०२१ पासुन मी आष्टी पोलीस स्टेशनला कार्यरत आहे. सदर गुन्ह्याचा दि. ०५/१२/२०२३ रोजी तपास माझ्याकडे आला. आष्टी ते शिराळ हे अंतर १०–१२ कि.मी. व शिराळ ते कडा १२ कि.मी. अंतर आहे. शिराळपासुन मदने वस्ती २–२.५ कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तपास आल्यानंतर मी त्या दिवशी काहीही कार्यवाही केली नाही. मदने वस्ती २०–२५ लोकांची वस्ती आहे. शिराळवरुन कडा येथे जाण्यासाठी २०–२५ मिनीटे लागतात. शिराळ ते हनुमंतगाव अंतर नक्की सांगता येत नाही. पंचाना लेखी नोटीसा दिल्या नव्हत्या. साक्षीदारांना तपासाकामी लेखी नोटीस दिल्या नव्हत्या. शिराळ येथील पोलीस पाटीलांकडे तपासकामी चौकशी केली नाही. दि. ०३/१२/२०२३ रोजी फिर्यादी व साक्षीदारांचा घटना घडलेबाबत पोलीस स्टेशनला फोन आला किंवा कसे याबाबत माहिती नाही. फोनवर तक्रार प्राप्त झाल्यावर त्याची नोंद घेतली जाते किंवा कसे याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी यांचे घर शेजारी– शेजारी आहे. पंच सा.क्र. ५ बबन धोंडिबा श्रीराम हा फिर्यादीचा काका असलेबाबत माहिती नाही. सा.क्र. २ फिर्यादीचा पती, साक्षीदार पन्नालाल मदने सासरे, सा.क्र. ३ व ४ फिर्यादीचे दीर असलेबाबत माहिती आहे.

५. मदनेवस्तीवर एकुण ५०–६० लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे नातेवाईक वगळता स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब नोंदवु शकत होतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने सुचवल्याप्रमाणे मी तपासातील साक्षीदार घेतले. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर तात्काळ पंचनामा न केल्यास घटनास्थळाची परिस्थिती बदले. घटनास्थळ संरक्षित केले नव्हते. फिर्यादी व आरोपीच्या पुर्वीच्या वादाबाबत तसेच पुर्वी केलेल्या केसेस बाबत तपास केला नाही. फिर्यादी व साक्षीदार आरोपींना त्रास देत असलेबाबत ४ अदखलपात्र तक्रारी दाखल झाल्या त्या बाबत तपास केला नाही. फिर्यादी व आरोपी यांचे महसुली कागदपत्रे जप्त केली नाही. आरोपी व फिर्यादी यांचे घर कोणाचे नावावर आहे हे सांगता येत नाही. परंतु कोणाचे घर कोणते आहे हे सांगु शकतो. घटनास्थळी सी.सी.टी.व्ही. नव्हते.

६. सा.क्र. २ फिर्यादीचा पती राजेंद्र यांनी तपास टिप्पन नोंदवतांना, आष्टी येथे फिर्यादीच्या डोक्यात टाके घेतले, शांतीलाल मदने व आप्पासाहेब मदने भांडणे सोडवण्यासाठी आले होते, फिर्यादीने/ पत्नीने सी.टी. स्कॅन केला, तीन दिवस शरीक होतो, आरोपी क्र. ३ तुषार तेथे आला व माझ्या पत्नीच्या कपाळावर मारले, भाड्याने प्रवासी घेऊन माझ्या गाडीने औरंगाबाद येथे जात होतो, अ.नगर येथील

सरकारी दवाखान्यात गेलो. तेथे फिर्यादीचा सि.टी. स्कॅन केला हा मजकुर सांगितला नव्हता. फिर्यादी यांनी जबाब देतांना, भांडणे सोडवण्यासाठी गेले, आवाजाने वस्तीवर लोक जमा झाले, हा मजकुर सांगितला नाही. आरोपी रुपाली हिचे सासरे आप्पासाहेब यांची जमीन पाटामध्ये गेलेबाबत तपास केला नाही. गु.र.नं. ५२४/२०२३ व ५२७/२०२३ दोन्ही गुन्ह्याचा तपास मी केला आहे. गु.र.नं. ५२४/२०२३ मधील घटना तपासाअंती खरी असल्याचे सिध्द झाले. मुद्देमाल फावडे बाजारात सहज उपलब्ध होते. तसेच दगड कोठेही पडलेला असतो.

७. मुद्देमाल फावडे फिर्यादीने दिले. वैद्यकीय प्रमाणपत्र १–१.५ महिन्यांनी प्राप्त केले. पंच हे वेगवेगळ्या गावचे आहेत. अमान्य की, पंचनामा केल्याचे, मुद्देमालाची पावती केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल पावतीमध्ये ते कोणाकडुन जप्त केले हे नमुद नाही. अमान्य की, सरतपासातील मजकुर खोटा नमुद केला आहे. अमान्य की, फिर्यादीच्या पतीशी संबंध असल्यामुळे खोटा तपास केला. अमान्य की, तपासामध्ये आरोपी विरुध्द पुरावा मिळुन आला नाही. मुद्देमाल दगड गोल आहे. अमान्य की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

दि. ३०.०३.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH
Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.04.01 12:28:19 +0530

श्री.एम.आर.बडाख
३ रे न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, आष्टी